# मुंबई विद्यापीठ

शिनिमावि (विशि)/अनिवि/आयसीडी/२०१९–२०/९

परिपत्रक :–

विद्यापीठाच्या विविध विभागांचे संचालक व विभागप्रमुख, प्राचार्य, सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय, समन्वयक, रत्नागिरी/ठाणे उपकेंद्र, विश्वभूषण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय अंबाडवे, विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालय, तळेरे, प्रभारी संचालक ज्ञानस्त्रोत केंद्र व या विभागामध्ये कार्यरत सर्व शिक्षक यांना कळवण्यात येते की, आपल्या विभागातील शिक्षकांच्या कार्यरजा/बालसंगोपन रजा/बाहेरगावी/परदेशात जाण्याची परवानगी/ पासपोर्ट, व्हीसा यांचे नाहरकत प्रमाणपत्र (NOC) इत्यादींबाबत मा. कुलगुरूंच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. मात्र बऱ्याचदा असे निर्दशनास आले आहे की, असे प्रस्ताव अचानकपणे दोन दिवस अगोदर सादर केले जातात व त्यानंतर मंजूरीसाठी घाई केली जाते त्यामुळे मला प्राप्त आदेशानुसार आपणांस असे कळविण्यात येते की, उपरोक्त रजा मंजूरीसाठी/प्रकरण परत्वे विविध परवानगी मिळण्यासाठी किमान १५ दिवस अगोदर या विभागाकडे प्रस्ताव सादर करावा. त्याचप्रमाणे असे प्रस्ताव विभागप्रमुखांच्या योग्य त्या शिफारशींसह सादर करण्यात यावे हि विनंती.

सदर परिपत्रक आपल्या विभागाच्या सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात यावे व शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांच्या निर्दशनास आणून देण्यात यावे.

(दत्ता घुगे)
उपकुलसचिव
शिनिमावि (विशि)

मुंबई : ४०० ०३२.
दिनांक : २ ऑक्टोबर, २०१९.

प्रत : सर्व विभागप्रमुख, मुंबई विद्यापीठ, मुंबई.